N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गोंदिया **P.S.(ठाणे):** तिरोडा

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0689 **Year (वर्ष):** 2026

Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ): 18/07/2026 10:43

2.

S.No. (अ.क्र.)	**Acts (अधिनियम)**	**Sections (कलम)**
1	भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८	7
2	भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८	12

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

Time Period (कालावधी):

Date From (दिंनाक पासून): 08/06/2026

Date To (दिंनाक पर्यंत): 09/06/2026

Time From (वेळेपासून): 16:20 बजे

Time To (वेळेपर्यंत): 14:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

Date (दिंनाक): 18/07/2026 **Time (वेळ):** 10:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ):**

Entry No. (नोंद क्र.): 015

Date & Time (दिंनाक आणि वेळ): 18/07/2026 10:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** गैअर्जदार यांचे तिरोडा रेल्वेस,तिरोडा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** निलेश लोधी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)**

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address (पत्ता):**

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदि,गोंदिया,तिरोडा,गोंदिया,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदि,गोंदिया,तिरोडा,गोंदिया,महाराष्ट्र,भारत

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

Mobile (मोबाइल नं.): 91-7620383888

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	ईलोसे श्री अषोक असाटी			1. नगर परिशद तिरोडा ,तिरोडा, तिरोडा,गोंदिया,महाराष्ट्र,भारत
2	कैलास किसन वाघमारे			1. तिरोडा,तिरोडा,तिरोडा,गोंदिया, महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):**

लेखी

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान	रेकॉर्ड प्लेअर	दोन 32 जीबी क्षमतेच्या सॅन्डिक्स कंपनीचे मेमरी कार्ड	0.00

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

0.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत):**

र्फियाद

लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया
दिंनाकः- 18.07.2026

नांवः- निलेष सुरेष लोधी, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया
मो. क्र. 7620383888.

आम्ही शासनातर्फे र्फियाद देतो की, पोलीस उपअधिक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया येथे विभागप्रमुख म्हणुन कार्यरत आहोत. आम्ही दिंनाक 08.06.2026 रोजी तात्पुरते राहत असलेल्या शासकीय विश्रामगृह येथे हजर असतांना वेळ 08.57 वा. आमचे मोबईल क्र. 7620383888 वर मोबाईल क्रमांक 9970207444 वरुन कॉल आल्याने तो कॉल रिसीव्ह केला असता कॉल करणारे इसमाने त्यांचे नाव उदेलाल रुषीलाल बोपचे रा. तिरोडा असे सांगुन त्यांनी नगर परिषद सार्वत्रीक निवडणुक सन 2025 मध्ये डेकोरेषन व कॅटरींगची सेवा पुरविली होती, त्याबाबतचे बिल काढुन देण्याच्या मोबदल्यात नगर परिषद कार्यालय तिरोडा येथील नगराध्यक्ष श्री. अषोक असाटी हे 3,20,000/-रु. लाचेची मागणी करीत असल्याने त्यांच्याविरुध्द तक्रार करायची आहे परंतु काही अडचणीमुळे गोंदिया येथे आपले कार्यालयात येणे मला शक्य नाही, आपण तिरोडा येथे येऊ शकता काय? असे कळविल्याने आम्ही त्यांना तिरोडा येथे येऊ शकतो असे आष्वासीत करुन लाचेमध्ये देण्याकरीता 3,20,000/- घेवुन वेळ 14.00 वा. पर्यत तिरोडा-चुरडी रोडवरील काषिघाट येथे हजर येण्यास सांगीतले.
तक्रारदार यांनी आम्हास फोनव्दारे दिलेल्या तक्रारीवरुन लाच मागणीची पडताळणी करुन पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी आमचे अधिनस्त अंमलदार यांच्या हस्ते दोन कर्मचारी पंच म्हणुन काम करण्यास उपलब्ध करून देण्याबाबत मा. कार्यकारी अभियंता, गोंदिया पाटबंधारे विभाग गोंदिया यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक 570/2026 दि. 08.06.2026 अन्वये दिले असता त्यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक 1168/2026 दि. 08.06.2026 अन्वये श्री. हर्षद विनायकराव साळवे व श्री. पुरुषोत्तम शालिकराम तंबोरे हे दोन कर्मचारी पंच म्हणुन उपलब्ध करुन दिल्याने सदर दोन्ही पंच वेळ 12.30 वा. लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया कार्यालयात हजर आले. अधिनस्त अंमलदार यांनी वरील नमुद दोन्ही पंचाची आमच्याषी ओळख करून दिली. आम्ही दोन्ही पंचांना सांगितले की, आमच्याकडे एका तक्रारदाराने एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधात फोनव्दारे तक्रार सांगीतली असुन तक्रारदार हे तिरोडा-चुरडी रोडवरील काषिघाट परिसरात भेटतील त्यांची तक्रार ऐकुन घेवुन तक्रारीनुसार नमूद लोकसेवकाने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजित करून पुढील कायदेशीर कारवाई करावयाची आहे असे सांगुन सदर लाच सापळा कारवाईत पंच म्हणुन काम करण्याची त्यांची संमती विचारली असता त्यांनी पंच म्हणुन काम करण्याची संमती दिली. त्यावरुन श्री. हर्षद विनायकराव साळवे यांना पंच क्र. 1 तर श्री. पुरुषोत्तम शालिकराम तंबोरे यांना पंच क्र. 2 म्हणुन नेमण्याचे ठरविण्यात आले. सापळा पथकाचा नमुद दोन्ही पंचांषी परिचय करून दिला.

त्यानंतर अधिनस्त अंमलदार यांनी सापळा कार्यवाहीसाठी लागणारे सर्व साहीत्याचे ट्रॅप सुटकेस, लॅपटॉप, प्रिंटर जोडणी उपकरणासह असे संपुर्ण साहित्य खाजगी चारचाकी वाहनामध्ये ठेवले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक खाजगी वाहनाने लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, गांेदिया येथुन तिरोडा-चुरडी रोडवरील काषिघाट येथे जाण्याकरीता वेळ 13.00 वा. रवाना होवुन 14.15 वा. सुमारास तिरोडा-चुरडी रोडवरील काषिघाट येथे पोहचलो असता तिरोडा-चुरडी रोडवरील काषिघाट येथे एक ईसम मोपेड गाडीसह थंाबुन असल्याचे दिसुन आल्याने थांबुन असलेले ईसम हे तक्रारदार आहेत किंवा कसे? याबाबत खात्री करण्याकरीता आम्ही आमचे मोबाईल क्रमांक 7620383888 वरुन तक्रारदार यांच्या मोबाईल क्रमांक 9970207444 वर कॉल केला असता त्या ईसमाने फोन उचलुन मी तिरोडा-चुरडी रोडवरील काषिघाट येथे उभा असल्याचे संागीतल्याने त्यांना आम्ही काषिघाट येथे पांढÚया रंगाच्या खाजगी चारचाकी वाहनामध्ये असल्याचे सांगीतल्यावर ते वाहनाजवळ आले व त्यांनी मीच कॉल केला होता असे सांगुन आपले नाव- श्री. उदेलाल रुषीलाल बोपचे, वय-60 वर्ष, रा. षितला माता मंदीर जवळ नेहरु वार्ड तिरोडा, ता. तिरोडा, जि. गोंदिया असे सांगीतले. आम्ही आपले वाहन कोणाचेही नजरेस पडणार नाहीत अषाप्रकारे नजरेआड आडोषाला ठेवुन व त्याच ठिकाणी बसुन पुढील कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविले.

त्यानंतर तक्रारदारास आम्ही, आमचा परिचय देऊन उपस्थित दोन्ही पंच व सापळा पथकाषी परिचय करुन दिला. त्यांनतर तक्रारदार यांना दोन्ही पंचासमक्ष त्यांच्या तक्रारीबाबत विचारपुस करुन त्यांना त्यांची तक्रार लिहुन देण्यास सांगीतले व त्यांना आमच्या जवळील कागदपेन उपलब्ध करुन दिला. त्यानंतर त्यांनी आपले स्वहस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली. आम्ही ती तक्रार वाचुन दोन्ही पंचास वाचण्यास दिली, दोन्ही पंचानी वाचुन व तक्रारदार यांनी आम्हा व दोन्ही पचंासमक्ष कथन केलेली तक्रार बरोबर असल्याची खात्री झाल्याने त्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी तारखेनीषी स्वाक्षरी केली, त्यांनतर आम्ही त्यावर स्वाक्षरी केली. तक्रारदार यांनी लिहुन आणलेली तक्रार खालील प्रमाणे.

दिंनाकः- 08.06.2026

प्रति,

माननीय पोलीस उपअधिक्षक,
लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, गोंदिया

विषयः- नगर परिषद सार्वत्रीक निवडणुक-2025 साठी डेकोरेषन व कॅटरींग सेवा (भोजन) पुरविल्याचे बिल मंजुर करण्यासाठी 3,20,000/- रुपयाची लाच मागणारे श्री अषोक असाटी, नगराध्यक्ष न.प. तिरोडा यांच्यावर कायदेषीर कार्यवाही करणेबाबत.

तक्रारदारः-श्री. उदेलाल रुषीलाल बोपचे, वय-60 वर्ष, व्यवसाय- डेकोरेषन व कॅटरींग, रा. षितला माता मंदिर जवळ, नेहरू वार्ड, तिरोडा ता. तिरोडा जि. गोंदिया. मो.क्र. 9970207444, 9049150900

महोदय,

सविनय सादर की, मी वर नमुद प्रमाणे असुन माझ्ाा उज्वला डेकोरेषन, हर्षल कॅटरींगचा व्यवसाय असुन त्याचा परवाणा क्रमांक 2152400315064615, 2152400315064400 असा आहे. जिएसटी नंबर 27BGBPB5558E2ZM असा आहे. ऑर्डर प्रमाणे डेकोरेषन व कॅटरींग सेवा पुरविण्याचे काम करतो.

नगर परिषद सार्वत्रीक निवडणुक तिरोडा 2025 चे डेकोरेषन व कॅटरींग सेवा पुरविण्याचे काम ऑफलाईन निविदा नुसार मला भेटले होते. त्यानुसार मी तिरोडा नगर परिषद सार्वत्रीक निवडणुक 2025 दरम्यान डेकोरेषन, जेवन, नाष्ता व चाय पुरविला आहे. निवडणुक झाल्यानंतर 28/12/2025 रोजी सदर कामाचे हर्षल कॅटरींग नावाने 7,72,000/- रुपयाचे बिल व उज्वला डेकोरेषनचे 17,50,000/- रुपयाचे बिल नगर परिषद तिरोडा येथे दाखल केले होते. त्यानंतर सदर बिल मंजुरीसाठी मी न.प. सी.ओ. श्री अमोल माडकर साहेब यांच्याकडे जानेवारी 2026 ला गेलो असता त्यांनी एवढे बिल मंजुर होवू शकत नाही बिल खुप जास्त आहे. दोन्ही बिंलाचे े 10,00,000/- रुपये, 10,00,000/- रुपये (दहा दहा लाख रुपये) मंजुर होवु शकतात तेव्हा मी त्यांना एवढे कमी बिल घेवु नाही शकत असे म्हणालो असता त्यांनी तुम्ही नगराध्यक्षाला जावुन भेटा असे सांगीतले. त्यानंतर मी बराच वेळा सी.ओ. साहेबांना भेटलो असता त्यांनी माझे बिल काढले नाही.

दिंनाक 20/05/2026 रोजी वेळ 4ः30 वाजता सुमारास माझ्या बिलासाठी नगराध्यक्ष श्री अषोक असाटी यांचे लाला चौक येथे कार्यालयात जावुन बिल मंजुर करण्याबाबत बोललो असता त्यांनी नगर परिषद कार्यालयात माझ्या ऑफीसात भेटा असे सांगीतले. त्यांनतर 5ः00 वाजे दरम्यान न.प. येथील श्री असाटी यांच्या कार्यालयात गेलो असता असाटी साहेबांनी सी.ओ. ला बोलावुन घेतले. तेथे श्री असाटी साहेब यांनी 16,00,000/- रुपये मंजुर होवु शकतात त्यापेक्षा जास्त रुपये देवू शकत नाही आणि त्यातुनही तुम्हाला सी.ओ., ऑडीटर व कॅषीयर साहेबांना पैसे द्यावे लागतील असे सांगीतले.
तेव्हा काही न बोलता निघुन आलो. त्यानंतर दिंनाक 21/05/2026 रोजी वेळ सकाळी 10ः00 वाजता सुमारास नगराध्यक्ष श्री असाटी यांना फोन करून किती पैसे द्यावे लागतील असे विचारले असता त्यांनी फोनवर बोलू शकत नाही त्यांनी कार्यालयात येण्यास सांगीतले. तेव्हा मी लाला चौकातील कार्यलयात जावून नगराध्यक्ष श्री असाटी यांची भेट घेतली असता त्यांनी माझा उजवा हात पकडून त्यावर 3,20,000/- रुपये लिहुन एवढे पैसे द्यावे लागतील असे सांगीतले तेव्हा मी त्यांना खुप जास्त होतात असे सांगुन 1,60,000/- रुपये देवू शकतो असे म्हणालो. तेव्हा त्यांनी होणार नाही असे सांगीतले. तेव्हा मी नाईलाजाने होकार दिला. तेव्हा त्यांनी कॅषीयर चाफले साहेब यांना बोलावून माझे बिल काढण्यास सांगीतले व मला म्हणाले की, बिलाचा चेक मिळाल्यावर तो तुटल्यानंतर 3,20,000/- रुपये तु माझ्याकडे किंवा भोयर पि.ए. कडे देण्यास सांगीतले. श्री अषोक असाटी, नगराध्यक्ष तिरोडा नगर परिषद हे माझे बिल मंजुर करण्याच्या मोबदल्यात मागत असलेले 3,20,000/- रुपये ही कायदेषी फिस नसुन लाच रक्कम असल्याची माझी खात्री पटली आहे. ती लाच रक्कम देण्याची माझी मुळीच इच्छा नाही. तरी श्री अषोक असाटी, नगराध्यक्ष न.प. तिरोडा यांच्यावर कायदेषीर कारवाही करण्यास विंनती आहे. श्री अषोक असाटी नगराध्यक्ष यांचे व माझे यापुर्वीचे कोणतेही आर्थीक देवाणघेवाण अथवा भांडण तंटा नाही.

त्यानंतर तक्रारदार यांना गै.अ. यांना लाचेमध्ये देण्याकरीता 3,20,000/- रु आणले काय? असे विचारले असता तक्रारदार यांनी बॅकेतुन रक्कम विड्राल झाली नसल्याने सोबत घेवुन आलो नसल्याचे सांगीतले. तक्रारदार व दोन्ही पंच यांना सदर कार्यवाहीमध्ये उपयोगात येणाÚया अॅॅथ्रॉसीन पावडर, अल्ट्राव्हायलेट लॅम्प त्यांचे वैषिष्टे समजावून सांगुन त्याबाबत तसेच सदर कार्यवाहीदरम्यान तक्रारदार व गै.अ.लोकसेवक यांचेत होणारे संभाषण कार्यालयीन व्हॉईस रेकॉर्डरद्वारे मेमरीकार्डमध्ये कषाप्रकारे ध्वनीमुद्रीत करण्यात येते यासंबंधाने व्हॉईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती देवुन त्याबाबत प्रात्याक्षिक करुन दाखविण्यात आले.

तक्रारदार यांना गै.अ. अषोक असाटी, नगराध्यक्ष, नगर परिषद तिरोडा हे कोठे आहेत? याची शहनिषा करण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी गै.अ. अषोक असाटी यांचा पि.ए. शुभम भोयर यास वेळ दुपारी 03.10 वा फोन लावला व फोनचा स्पिकर सुरु करुन अषोक असाटी बाबत माहिती घेतली असता ते कार्यालयात आले नाहीत ते आल्यावर फोन करतो असे शुभम भोयर यांनी सांगीतले. त्यावरुन शुभम भोयर यांचा तक्रारदार यांना फोन येण्याची वाट पाहात थांबलो. अंदाजे दुपारी 04.16 वा. दरम्यान शुभम भोयर यांचा तक्रारदार यांना फोन आल्याने त्यांना स्पिकर सुरु करुन फोन उचलण्यास सांगीतले असता, शुभम भोयर यांनी भैय्या (अषोक असाटी) ऑफीसला आल्याचे सांगीतले. त्यावरुन गै.अ. यांचे विरुध्दची लाच मागणी पडताळणी कार्यवाही गै.अ. यांचे खाजगी कार्यालयात जावुन करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्यांना लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान घेण्यात येणाÚया दक्षतेबाबत सुचना सांगीतल्या. त्यानंतर पंच क्रमांक 1 यांना सांगीतल्यावरुन त्यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली. त्यानंतर सोनी कंपनीचा ICD-PX470 कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकार्डरमध्ये सॅनडिस्क कंपनीचा नविन मेमरी कार्ड सिरीयल क्र. 5334XV54141F चा असलेला टाकुन सुस्थितीत करुन ठेवुन असलेला व्हॉईस रेकॉर्डर वेळ 16.20 वाजता सुरु करुन पंच क्र. 1 व तक्रारदार यांचे आवाजात लाच मागणी पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबतचे संभाषण ध्वनिमुद्रित करून तोे व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयामध्ये शर्टचे आत दोरीने लटकवुन पंच क्र. 1 यांचे सोबत तक्रारदार यांचे मोपेड गाडी क्र. MH-35/AM-9501 ने गै.अ. यांचेषी लाच मागणी संबधाने बोलणी करण्याकरीता गै.अ यांचे तिरोडा रेल्वे स्टेषन रोडवरील श्याम कॉमप्लेक्स येथील खाजगी कार्यालयात पाठविण्यात आले. आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील सर्व सदस्य त्याच ठिकाणी थांबुन राहीलो.

तक्रारदार हे गै.अ. अषोक असाटी यांचेषी बोलणी करून पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी परत आल्यावर त्यांचे गळयात असलेले व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात वेळ 17.00 वाजता बंद करण्यात आलेे. व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमरी कार्ड मधील PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260608_1620.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले. सदर फाईल मधिल संभाषण दोन्ही पंचासमक्ष

ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविल्यावर त्यांच्यात झालेल्या संभाषणावरुन गै.अ. यांनी तक्रारदार यांना त्यांचे तिरोडा नगरपरिषद सार्वत्रीक निवडणुक/2025 करीता डेकोरेषन व कॅटरींग सेवा पुरविल्याचे रु. 16,00,000/- चे बिल काढुन देण्याकरीता पहीले रु.6,00,000/- चे चेक दिल्याचे मोबदल्यात रु.1,20,000/- लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम भोयर यांचेकडे देण्यास सांगुन नंतर रु. 10,00,000/- चे चेक मिळाल्यावर त्याचे जे होतील ते आणुन देषील अषाप्रकारे लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविल्याचे तसेच गै.अ. यांचे कार्यालयात बसुन असलेले कैलाष किसन वाघमारे (खाजगी इसम) यांनी तक्रारदार यांना लाच मागणी पडताळणी दरम्यान अभी छे लाख रुपये दिये बोलते, उसके जितने बंते उतने अभी दे दे, बाकी जिस दिन दस मिलेंगे उसके बाद दे देना, जैसे आपकी बात हुयी उसके हिसाब से करो असे म्हणुन लाच देण्याकरीता प्रोत्साहीत केल्याची आमची व दोन्ही पंचाची खात्री झाली तसेच तक्रारदार यांनी गै.अ.यांना लाचेची रक्कम उदयीक रोजी त्यांचे ऑफिस मध्ये आणुन देत असल्याचे सांगीतले असल्याने दिंनाक 9.6.2026 रोजी गै.अ. यांचे कार्यालयात जावुन सापळा कारवाही करण्याचे सर्वानुमते ठरविले.

तक्रारदार यांनी लाच मागणी पडताळणी पुर्वी बॅकेतुन रक्कम विड्राल झाली नसल्याने लाच रक्कम सोबत घेवुन आलो नसल्याचे सांगुन लाच रक्कम जमा केली नव्हती.परंतु आता लाच मागण्ी पडताळणीमध्ये गै.अ.यांनी तक्रारदार यांचेकडे रु.6,00,000/- चे चेक दिल्याचे मोबदल्यात रु.1,20,000/- लाच रक्कमेची मागणी केली असल्याने व उदयीक रोजी सदरची लाच रक्कम गै.अ.यांचे सांगणेप्रमाणे भोयर यांचेकडे देणे असल्याने तक्रारदार यांना लाच रक्कम रु. 1,20,000/- जमा करण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम रु.120,000/- आणुन आमचेकडे जमा केली. सदर नोटांची वेगळी यादी तयार करण्यात आली. त्यानंतर आमचे अधिनस्त अंमलदार यांनी आपले हाताच्या बोटाने तक्रारदाराने लाच म्हणून द्यावयासाठी हजर केलेल्या रू. 500/- दराचे 240 चलनी नोटांना दोन्ही बाजुने अ्ॅंथ्रॉसीन पावडर लावुन अ्ॅंथ्रॉसीन पावडर लावलेल्या चलनी नोटा एकुण रू. 1,20,000/- एका कागदी लिफाफ्यात टाकुन त्या लिफाफ्यावर पंच व आमचे सहीचे कागदी लेबल लावुन पंचासमक्ष सिंलबद करुन तो लिफाफा ट्रॅप सुटकेसमध्ये सुरक्षित ठेवुन दिला. तक्रारदार यांना ठरलेल्या याच ठिकाणी दिंनाक 9.6.2026 रोजीचे 10.00 वा. सुमारास हजर राहण्याचे तसेच दरम्यानच्या काळात गै.अ. यांचा फोन आल्यास त्यास संषय येणार नाही असे समर्पक उत्तरे दयावीत व त्याबाबत आम्हास अवगत करुन आमचे सांगणेनुसार पुढील कार्य करावे् व सदर कारवाई बाबत गोपनियता राखण्याचे सांगुन त्यांचे गावी जाण्यास रवाना केले. गोपनियता व सुरक्षीततेच्या दृष्टीने सदर कारवाईचा पंचनामा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे जावुन करण्याचे ठरवुन वेळ 19.30 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे जाण्यास सापळा पथक व दोन्ही पंच रवाना होऊन वेळ 20.30 वाजता लाचलुचपत प्रतिबधक विभाग, गोंदिया येथे पोहचलो. लाच मागणी पडताळणी कार्यवाहीदरम्यान तक्रारदार व गै.अ. यांचेतील झालेले ध्वनिमुद्रीत संभाषणाची फाईल 260608_1620.mp3 ची स्क्रीप्ट तयार करुन त्यास परिषिष्ठ-अ असे षिषक देण्यात आले. सदर फाईलाची हॅष व्हॅल्यु "FBB6BB4261E773AEB65BFF1A9E0FF760" असल्याची दिसुन आली. फाईल क्र. 260608_1620.mp3 असलेले मेमरी कार्ड त्यांचे मुळ आवरणामध्ये ठेवुन ते आवरण बबल रॅपरमध्ये सुरक्षित करुन हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यात ठेवले. सदर लिफाफ्यावर मुददेमालाचे वर्णनाचे टंकलिखीत कागद चिटकावुन त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सह्या करुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिंलबद करुन ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवुन दिला. त्यानंतर सापळा पथक व दोन्ही पंच यांना सदर कारवाई बाबत गोपनियता बाळगण्याचे सांगुन दिंनाक 09.06.2026 रोजी सकाळी 08.00 वा. हजर येण्यास सांगीतले. सदर कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

दिंनाक 09.06.2026 रोजी दोन्ही पंच व सापळा पथक कार्यालयात हजर आहेत. गै.अ. यांचेविरुध्दची सापळा कार्यवाही त्यांचे तिरोडा रेल्वे स्टेषन रोडवरील शाम कॉम्पलेक्स येथील कार्यालयात जावुन करणे असल्याने आमचे सुचनेवरुन अधिनस्त अंमलदार यांनी सापळा कार्यवाही साठी लागणारे सर्व साहीत्याचे ट्रॅप सुटकेस, लॅपटॉप, प्रिंटर जोडणी उपकरणासह असे संपुर्ण साहित्य शासकीय वाहन क्र. एम.एच.35/एडब्ल्यु 0486 मध्ये ठेवले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक शासकिय वाहनाने आणि खाजगी चारचाकी वाहनाने लाचलुचपत प्रतिबधक विभाग, गांेदिया येथुन तिरोडा-चुरडी रोडवरील काषीघाट येथे जाण्याकरीता 09.30 वा. रवाना होवुन 10.30 वा. पोहचलो असता आम्ही सांगीतल्या प्रमाणे तक्रारदार हे तिथे हजर होते. त्याच ठिकाणी बसुन पुढील कार्यवाही करण्याचे सर्वांनुमते ठरविण्यात आले्. पंच, सापळा पथक व तक्रारदार यांना सापळा कार्यवाहीदरम्यान घेण्यात येणा-या दक्षतेबाबत सुचना समजावुन सांगीतले. दोन्ही पंचाना आमची व सापळा पार्टीतील कर्मचाÚयांची अंगझडती घेण्यास सांगीतल्यावरुन त्यांनी अंगझडती घेवुन सापळा पार्टीतील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे संशयास्पद वस्तु नसल्याची खात्री केली. त्यानंतर सापळा पार्टीतील सर्व सदस्यांना तयार करण्यात आलेल्या

वेगवेगळया पथकांची माहिती देवुन सापळा कार्यवाहीवेळी आप-आपल्या भुमिकेसंबंधात घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्यात.

त्यानंतर तक्रारदार यांना त्यांच्या जवळ असलेले सर्व वस्तु, पैसे काढून ठेवण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांची अंगझडती घेण्यास सांगीतले त्यावरुन त्यांनी तक्रारदार यांची अंगझडती घेतली व त्याबाबत अंगझडतीची यादी तयार करण्यात आली. गै.अ. यांनी तक्रारदाराकडुन रु. 1,20,000/- लाच रक्कम प्राप्त करण्याचा प्रयत्न केल्याने अ्ँ्थ्रासीन पावडर लावलेल्या रू. 500/- दराचे 240 चलनी नोटा असे एकुण रू.1,20,000/- चा लाच रक्कमेचा लिफाफा आमचे सुचनेवरुन अधिनस्त अंमलदार यांनी ट्रॅप सुटकेसमधुन बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचेकडे दिला, पंच क्र. 1 यांनी लिफाफ्यातुन लाच रक्कम बाहेर काढुन तक्रारदार यांचे फुलपँटचे समोरील दोन्ही खिषात ठेवुन दिल्या व सदरचा लिफाफा जाळुन नष्ट करण्यात आला. त्यानंतर पंच क्र.1 यांनी त्यांचे हात धुवुन स्वच्छ केले. गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्याबाबत तक्रारदार यांनी नियोजित ईषारा केल्यावर करण्यात येणाÚया पुढील कार्यवाहीचे चित्रीकरणाकरीता 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क कंपनीचे ज्याचा सिरीयल क्र. 5334XV54142E असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन कार्यालयीन रियल मी कंपनीचे मोबाईलमधील मेमरी कार्ड स्लॉट मध्ये प्देमतज केले. त्यानंतर मोबाईल मधील सेटींगमध्ये जावुन फोटो व व्हिडीओ चित्रीकरण हे डायरेक्ट मोबाईलमधील मेमरी कार्डमध्ये जतन होणार असल्याचे सुनिष्चित करण्यात आले.

त्यानंतर आमचे अधिनस्त अंमलदार यांनी प्लॉस्टीक आवरणात बंद असलेले 32 जिबी क्षमतेचे सॅनडिस्क मायक्रो एसडी असे छापील नाव असलेले व सिरीयल क्र. 5334XV1810JC असलेला एक नविन मेमोरी कार्ड पंचासमक्ष काढुन कार्यालयीन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकले. व्हाईस रेकार्डर तक्रारदार व दोन्ही पंचाना दाखवुन व्हाईस रेकार्डरचे इंटरनल मेमरी आणि मेमरी कार्डमध्ये कोणत्याच प्रकारची पुर्वीची व्हाईस रेकार्डींग फाईल नसल्याबाबत खात्री करुन दिली. आम्ही सर्व हजर असतांना वेळ 12.09 वा सुमारास गै.अ. यांचे पि.ए. शुभम भोयर यांचा तक्रारदार यांना फोन आल्याने आम्ही तक्रारदार यांना फोनचे स्पिकर सुरु करुन बोलण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी त्यास बँकेत असल्याचे सांगुन अध्र्या एक तासात पैसे घेवुन येतो असे सांगीतले. दरम्यान गै. अ. अषोक असाटी हे कार्यालयात आहेत अगर कसे याबाबत गोपनिय माहिती काढली असता ते बाहेर असल्याचे समजले त्यावरुन ते कार्यालयात येण्याची वाट पाहत तिथेच थांबुन राहिलो. त्यानंतर गै.अ अषोक असाटी हे नगर परिषद कार्यालयात आले असल्याची गोपनिय माहिती मिळाली. त्यावरुन तक्रारदार यांना लगेच गै.अ. अषोक असाटी यांचे पि.ए. शुभम भोयर यांचे कडे लाच रक्कम देण्या करीता पाठविण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर आमचे अधिनस्त अंमलदार यांनी वेळ 13.22 वा. व्हाईस रेकार्ड सुरु करुन त्यामध्ये तक्रारदार व पंच क्र. 1 यांचे आवाजात लाच रक्कम देण्याकरीता गै.अ. यांचेकडे जात असल्याचे संभाषण ध्वनिमुद्रित करून ते व्हॉईस रेकॉर्डर कापडी पिषवित ठेवुन तक्रारदार यांचे गळयात दोरीचे सहायाने शर्टचे आत लटकवुन तक्रारदार व पंच क्र. 1 यांना आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणाहुन तक्रारदार यांचे खाजगी मोपेडने गै.अ. यांना लाच रक्कम देण्याकरीता गै.अ. यांचे रेल्वे स्टेषन रोडवरील श्याम कॉमप्लेक्स येथील खाजगी कार्यालय येथे जाण्यास रवाना करण्यात आले. त्यानंतर आम्ही, पंच क्र. 2 व सापळा कार्यवाही करीता तयार करण्यात आलेले वेगवेगळे सापळा पथक शासकीय वाहन व खाजगी चारचाकी वाहनाने जाण्यास रवाना झालो. आम्ही सर्व गै.अ. यांचे रेल्वे स्टेषन रोडवरील श्याम कॉमप्लेक्स येथील कार्यालया जवळ पोहचुन आप-आपले वाहन कोणालाही संषय येणार नाही अषा स्थितीत उभे करुन व तिथेच थांबुन तक्रारदार यांचे नियोजीत ईषाÚयाची वाट पाहत बसलो. काही वेळाने तक्रारदार हे नियोजित ईषारा न करता परत जातांनी दिसल्याने आम्ही सर्व त्यांचे मागोमाग तिरोडा-चुरडी रोडवरील काषिघाट येथे गेलो. त्यानंतर आमचे अधिनस्त अंमलदार यांनी तक्रारदार यांचे गळयात लटकवुन असलेले व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्यामध्ये पंच क्र. 1 यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डर 14.00 वाजता बंद केले. व्हॉईस रेकॉर्डरच्या मेमोरी कार्डच्या PRIVATE/SONY/REC_FILE/FOLDER-1 मध्ये फाईल 260609_1322.mp3 रेकॉर्ड झाल्याचे दिसुन आले. तक्रारदार व गै.अ. यांच्यातील रेकॉर्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले व दोन्ही पंचांना ऐकविले. तक्रारदार, शुभम भोयर व गै.अ. अषोक असाटी, नगराध्यक्ष, नगर परिषद तिरोडा यांचेतील झालेले ध्वनिमुद्रीत संभाषणाची स्क्रीप्ट तयार करुन त्यास परिषिष्ठ-ब असे षिषक देण्यात आले. सदर फाईलची हॅष व्हॅल्यु "B6A108E79808B42D392601C932AD36D0" असल्याची दिसुन आली. ध्वनिमुद्रीत संभाषणावरुन व पंच क्र. 1 यांनी केलेल्या कथनावरुन तसेच तक्रारदार यांना कोणासही फोन न करण्याची सुचना दिली असतांनाही तक्रारदार यांनी शुभम भोयर यांना वारंवार फोन करुन पैसे लेके आया, आप आ जाव तसेच इतर व्यक्ती जवळ सुध्दा शुभम को पैसे देना है असे बोलल्याने शुभम भोयर व गै.अ. अषोक असाटी यांना तक्रारदार यांच्या वागणुकीवर संषय येवुन शुभम भोयर यांनी इतर व्यक्ती रोषन याला पैसे घेण्यासाठी कार्यालयात पाठवितो असे सांगुण पैसे घेण्यास टाळाटाळ केली तसेच तक्रारदार यांना गै.अ. हे प्रत्यक्षात भेटल्यावर सुध्दा त्यांनी तक्रारदार यांचेकडुन

लाच रक्कम स्विकारण्यास नकार दिल्याचे समजुन आले. त्यानंतर पंच क्र. 1 यांना तक्रारदार यांचे खिष्यातुन लाच रक्कम बाहेर काढण्यास सांगीतले त्यानंतर ती लाच रक्कम एका कागदी लिफाफ्यात ठेवुन तो लिफाफा आमचे व दोन्ही पंचाचे सहीने सिंलबद करुन ट्रप सुटकेसमध्ये सुरक्षीत ठेवुन दिला व तक्रारदार यांना गै.अ अथवा शुभम भोयर यांचा लाचे संबधाने फोन येतो अगर कसे? याबाबत तिथेच वाट पाहत बसलो सायंकाळ होवुन सुध्दा तक्रारदार यांना फोन आला नाही. तक्रारदार यांना दरम्यानच्या काळात गै.अ. अशोक असाटी, नगराध्यक्ष, नगर परिषद तिरोडा किंवा शुभम भोयर यांचा फोन आल्यास आम्हास त्वरीत अवगत करुन आमचे सांगणेनुसार पुढील कार्य करावे व सदर कारवाई बाबत गोपनियता राखण्याचे सांगुन त्यांचे गावी जाण्यास रवाना केले. गोपनियता व सुरक्षीततेच्या दृष्टीने सदर कारवाईचा पंचनामा लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, गोंदिया येथे जावुन करण्याचे ठरवुन वेळ 18.30 वा. लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, गोंदिया येथे जाण्यास सापळा पथक व दोन्ही पंच रवाना होऊन वेळ 19.30 वाजता लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, गोंदिया येथे पोहचलो. सोबत घेतलेले सर्व साहित्य शासकिय वाहनातुन बाहेर काढुन कार्यालयीन कपाटात सुरक्षीत ठेवुन दिले. व्हॉईस रेकॉर्डरचे PRIVATE/SONY/ REC_FILE/ FOLDER-1 मध्ये रेकॉर्ड झालेली फाईल क्र. 260609_1322.mp3 फाईल असलेले मेमरी कार्ड त्यांचे मुळ आवरणामध्ये ठेवुन ते आवरण बबल रॅपरमध्ये सुरक्षित करुन हिरव्या रंगाच्या कागदी लिफाफ्यात ठेवले. सदर लिफाफ्यावर मुददेमालाचे वर्णनाचे टंकलिखीत कागद चिटकावुन त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सह्या करुन तो लिफाफा कार्यालयीन सिलने सिंलबद करुन ट्रॅप सुटकेस मध्ये सुरक्षित ठेवुन दिला. त्यानंतर सापळा पथक व दोन्ही पंच यांना सदर कारवाई बाबत गोपनियता बाळगण्याचे सांगुन दिंनाक 10.06.2026 कार्यालयीन वेळेत हजर येण्यास सांगीतले. सदर कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 2 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.

सापळा कार्यवाहीमध्ये गै.अ. अषोक असाटी यांचा पी.ए.शुभम भोयर यांना तक्रारदार यांच्या वागणुकीवर संषय येवुन त्यांनी इतर व्यक्ती रोषन याला पैसे घेण्यासाठी कार्यालयात पाठवितो असे फोनवर सांगुण पैसे घेण्यास टाळाटाळ केल्याने तसेच गै.अ. अषोक असाटी हे त्यांचे कार्यालयाचे बाहेर तक्रारदार यांना प्रत्यक्षात भेटल्यावर त्यांनी देखील लाच रक्कम स्विकारण्यास टाळाटाळ केली असुन यापुढे सुध्दा गै.अ.हे तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकरण्याची शाष्वती दिसुन येत नाही.

तरी, गै.अ. अषोक असाटी, नगराध्यक्ष, नगर परिषद कार्यालय तिरोडा, ता.तिरोडा जि.गोंदिया यांनी तक्रारदार यांना त्यांचे तिरोडा नगरपरिषद सार्वत्रीक निवडणुक/2025 करीता डेकोरेषन व कॅटरींग सेवा पुरविल्याचे रु. 16,00,000/- चे बिल काढुन देण्याकरीता पहीले रु.6,00,000/- चे चेक दिल्याचे मोबदल्यात रु.1,20,000 /- लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम भोयर यांचेकडे देण्यास सांगुन नंतर रु. 10,00,000/- चे चेक मिळाल्यावर त्याचे जे होतील ते आणुन देषील अषाप्रकारे लाच रक्कमेची मागणी करुन ती लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारण्याची तयारी दर्षविल्याने त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनीयम 1988 (संषोधन 2018) चे कलम 7 प्रमाणे तसेच कैलाष किसन वाघमारे (खाजगी इसम) यांनी तक्रारदार यांना लाच मागणी पडताळणी दरम्यान लाच देण्याकरीता प्रोत्साहीत केले असल्याने त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनीयम 1988 (संषोधन 2018) चे कलम 12 प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा दाखल होण्याकरीता कायदेषिर फिंयाद देत आहे.

(निलेष लोधी)
पोलीस उपअधीक्षक
लचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation: (**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

AMIT BALIRAM WANKHADE(I (Inspector)) / 146010004450AVWM85012

or (किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

Rank (पद**):** **No.(**क्र.**):**

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S. (**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

District (जिल्हा**):**

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.**)**

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): AMIT BALIRAM WAN

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.): 14601000450AVWM85(

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the (If known / seen)(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

S.No.(अ.क्र.)	Sex (लिंग)	Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष)	Build (बांधा)	Height (cms.) (उंची(सें. मी.))	Complexion (रंग)	Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा)
1	2	3	4	5	6	7
1	पुरुष					चेचक के दाग: NO
2	पुरुष					चेचक के दाग: NO

Deformities/ Peculiarities	Teeth (दात)	Hair (केस)	Eyes (डोळे)	Habit(s) (सवयी)	Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी)
8	9	10	11	12	13

Language /Dialect (भाषा / बोलीभाषा)	Place Of (का स्थान)					Others (इतर)
	Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा)	Leucoderma (कोड)	Mole (तिळ)	Scar (व्रण)	Tattoo (गोदण)	
14	15	16	17	18	19	20

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)